Exh. 11/A



रे. क. नं.४०/२०२६

मे. दिवाणी न्यायाधीशसो, क स्तर चंदगड,

यांचे कोर्टात ..................

१. श्री.धनाजी भरमू सलाम ........ वादी

विरूध्द

१. श्रीमती. मालन भरमू सलाम, वगैरे ......... प्रतिवादी

यातील वादी व प्रतिवादी यांची आपसांत संयुक्त पुरसिस खालीलप्रमाणे

१. दावा मिळकती हया यातील वादी व प्रतिवादी यांच्या वाडीलार्जित हिंदू एकत्र कुटुंबांच्या सामाईक वाहीवाटीच्या मिळकती आहेत.

२. यातील वादी हा प्रतिवादी नं.१ हिचा मुलगा असून प्रतिवादी नं. २ व ३ हया वादीच्या सख्या बहिणी आहेत. तसेच प्रतिवादी नं. ४ ही वादीची आजी असून प्रतिवादी नं. ५ ते ९ या आत्या आहेत.

३. यातील वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान पंच विदयामाने सदरचा दावा आपसांत मिटलेला आहे.

४. दावा मिळकती हया वादी व प्रतिवादी यांच्या हिंदु एकत्र कुटुंबाच्या वडीलोपार्जित मालकी वहीवाटच्या मिळकती आहेत. तसेच वादी व प्रतिवादी यांनी आपसात दावा मिळकतीचे वाटप करून घेतलेले आहे.

Scanned with OKEN Scanner

५. सदरील वाटणीमध्ये यातील वादी यास खालील दावा जमीनी वाटपास आलेल्या आहेत. ही वस्तुस्थिती वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबुल आहे.

६. वादी यास खालीलप्रमाणे जिल्हा कोल्हापूर तालुका चंदगड पैकी **घुल्लेवाडी** येथील शेतजमीन मिळकती वाटपास आलेल्या आहेत त्याचे वर्णन खालीलप्रमाणे -

| अ.नं. | गट नं. | क्षेत्र | आकार | पैकी क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| | | हे.आर | रू. पैसे | हे.आर |
| १ | २२२ | ०.०४ | ०.१८ | ०.०४ |
| २ | ४०३ | ०.०७.१० | १.०७ | ०.०७.१० |
| ३ | ४२१ | ०.०४ | ०.५० | ०.०४ |
| ४ | ५७३ | ०.१०.१० | ०.१०.१० | ०.१०.१० |
| ५ | ५८५ | ०.१७.२० | २.३२ | ०.१७.२० |
| ६ | ७०२ | ०.१३ | ०.४३ | ०.१३ |
| ७ | ७६० | ०.०३.५० | ०.४६ | ०.०३.५० |
| ८ | ७६४ | ०.०९.१० | १.१४ | ०.०९.१० |
| ९ | ७६६ | ०.०७ | ०.९४ | ०.०७ |
| १० | ७७३ | ०.०८.९० | १.१६ | ०.०८.९० |
| ११ | ८९२ | ०.०७ | ०.०१ | ०.०७ |
| १३ | ९३२ | ०.२६ | ०.१६ | ०.२६ |

Scanned with OKEN Scanner

जिल्हा कोल्हापूर तालुका चंदगड पैकी **लकीकटटे** येथील शेतजमीन मिळकत वाटपास आलेल्या आहेत त्याचे वर्णन खालीलप्रमाणे

| अ.नं. | गट नं. | क्षेत्र | आकार | पैकी क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | १५० | ०३.५५.०० | २.५० | ०.२५.०० |
| | **पोट खराब** | ००.०५.०० | | |

येणे प्रमाणे वरील शेत जमीन मिळकती हया यातील वादीच्या वाटणीला आलेल्या आहेत.

७. प्रतिवादी नं. १ ते ३ यांना जिल्हा कोल्हापूर तालुका चंदगड पैकी **घुल्लेवाडी** येथील शेतजमीन मिळकत वाटपास आलेली आहे. त्याचे वर्णन खालीलप्रमाणे

| अ.नं. | गट नं. | क्षेत्र | आकार | पैकी क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | ९१२ | ०.२२ | ०.२४ | ०.२२ |

येणे प्रमाणे वरील शेत जमीन मिळकत ही प्रतिवादी नं. १ ते ३ यांच्या सामाईक वाटणीला दिलेली आहे. ही वस्तुस्थिती वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबुल आहे.

८. यातील प्रतिवादी नं. १ ही वादी व प्रतिवादी नं. २ व ३ यांची आई असून वादी व प्रतिवादी नं. १ ते ३ हे एकमेकांचे भाऊ बहिण आहेत. तसेच प्रतिवादी नं. ४ ही यातील प्रतिवादी नं. १ ची सासू असून प्रतिवादी नं. ४ ते ९ या प्रतिवादी नं. १ च्या नंणदा आहेत.

Scanned with OKEN Scanner

९. यातील वादी चे आजोबा यांनी बराच पैसा कर्जावून घेवून प्रतिवादी नं. ५ व ९ यांची लग्न लावून दिलेली आहेत. तसेच प्रतिवादी नं. ५ व ९ हया आपले सासरी गुण्यागोविंदाने नांदत आहेत.तसेच यातील वादी हा प्रतिवादी नं. ५ ते ९ यांचे माहेरघरी जाणे-येणे माहेरपण चांगल्या प्रकारे करून प्रतिवादी नं. ४ हीचा चांगल्या प्रकारे सांभाळ करत आहेत. भविष्यात देखील प्रतिवादी नं. ४ हिचा वादी चांगल्या प्रकारे सांभाळ करेल अशी प्रतिवादी यांना खात्री आहे. तसेच प्रतिवादी नं. ५ ते ९ यांचे माहेरपण चांगल्या रितीने करेल याची प्रतिवादी यांना खात्री आहे. याबाबी वादी व प्रतिवादींना मान्य व कबुल आहेत. त्यामुळे प्रतिवादी नं. ४ ते ९ यांनी दावा मिळकतीतील त्यांचा कायदेशीर हिस्सा वादी यास तोंडी हक्कसोडपत्राने आजरोजी विना मोबदला सोडून दिलेला आहे. तसेच यातील प्रतिवादी नं. ९ हिस शिला राजू पेडकर व प्रतिवादी नं. ८ हिस सौ. आनंदी विठ्ठल नागरदेकर या नावाने देखील ओळखले जाते.

१०.यातील वादी व प्रतिवादी यांनी याकामी झालेल्या वाटणीप्रमाणे वागणेचे असून वादी अगर प्रतिवादींनी एकमेकांचे दावा जमीनींचे मालकी हक्काबाबत व वहीवाटीबाबत कोणतीही तक्रार करणेची नाही ही वस्तुस्थिती वादी व प्रतिवादींना मान्य कबुल आहे.

११.यातील वादी व प्रतिवादी यांचेत याकामी झालेली वाटणी वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबुल असून यातील प्रतिवादींनी वादीच्या वाटणीला आलेल्या शेतजमीनी दावा मिळकती व प्रतिवादींना वाटणीप्रमाणे आलेल्या मिळकतीचे मालकी व कब्जे हक्काशी यातील वादीचा व प्रतिवादींची कोणत्याही प्रकारचा हक्कसंबध राहीलेला नाही. त्याकारणाने वादीनी प्रतिवादींच्या मिळकतीशी व

Scanned with OKEN Scanner

प्रतिवादींनी वादीच्या मिळकतीशी कोणत्याही प्रकारचा हक्कसंबध सांगणेचा नाही.

१२.दावा मिळकतींचे याकामी झालेले वाटणी प्रमाणे दावा मिळकतीचे ७/१२ पत्रकी ज्यांची त्यांची नावे नोंद होण्यास वादी व प्रतिवादी यांची कोणतीही हरकत नाही. महसुल अधिकारी यांचे समोर याकामी झालेल्या वाटणीप्रमाणे वादी व प्रतिवादींची नावे नोंद होणेस वादी व प्रतिवादी यांनी विना हरकत सहया करणेचे/संमत्ती देणेचे आहे.

येणेप्रमाणे मे कोर्टांचा आपसांत हुकुमनामा व्हावा म्हणून दिली आपसांत संयुक्त पुरसिस असे.

**चंदगड**

**दिनांक - १४/०३/२०२६**

**वादीचे वकील**

**ॲड. एस.के.सावंत**

**वादी**

**प्रतिवादी नं. १**

प्र.वा.नं.१ प्र.वा.नं.-2 व 3 चे स्वतःकरिता त्यांचे अ.पा.क. म्हणून

**प्रतिवादी नं. २**

**प्रतिवादी नं. ३**

R.B.S

प्रतिवादी नं. ४

प्रतिवादी नं. ५

प्रतिवादी नं. ६

प्रतिवादी नं. १ ते ३ चे वकील

प्रतिवादी नं. ७

Sutar

प्रतिवादी नं. ४ ते ९ चे वकील
(Adv. M. G. Sutar)

प्रतिवादी नं. ८

प्रतिवादी नं.९

O

Both party alongwith their ld. advocate appeared and admitted the contents. They have signed the memo. It is verified, read & recorded. This memo be part of award.

14/3/26

Scanned with OKEN Scanner

Exh 12/A

**Appendix-I**

## BEFORE THE NATIONAL LOK ADALAT

## HELD AT CHANGAD

**(Orginized by Taluka Legal Services Committee,Chandgad under Section 19, of the Legal Services Authorities Act,1987(Central Act)**

**Petitioners /Plaintiff/Complainant:** Dhanaji Bharamu Salam

**Defendant/Respondent** : Smt. Malan Bharamu Salam

**No.of proceedings of the** RCS No. 40/2026 **--------------------------Court/Authority.**

**Present ---**

**Name of Judifial Oficer :- Shri. W. D. Jadhav**

**Retired Judicial Officer :-**

**-**

**Name of Members :- 1. Adv.Asmita Desai**

**2.**

Scanned with OKEN Scanner

# AWARD.

The dispute between the parties having been referred for determination to the Lok Adalat and the parties having compromised /settled the case/matter ,the following award is passed in terms of the settlment:

Settled as per Pursis at Exh /A

The parties are informed that the court fee, if any, paid by any of them shall be refunded .

Petitoner/Plaintiff/Complainant.

Defendant/Respondent.

Advocate for Plaintiff/. complainant/applicant

Advocate for Defendant/ Respondent/Non Applicant

Adv M.G. for Defendant No-4 to 9

Judicial Officer 14/3/26

Member

Member

Date. 14 /03 /2026

(Seal of the Authority/Committee)

TALUKA LEGAL SERVICES COMMITTEE ... PUR

सत्यमेव जयते